# नियमीत दिवाणी दावा क्र.११९/२०२१ मधील निशाणी ३० वरील आदेश

(CNR No.MHOS-10000283-2021)

वादींनी प्रस्तुतचा अर्ज वादी क्र.६ सत्यभामा बाबासाहेब शिंदे या मयत झाल्याने त्यांचे नाव दाव्यातून वगळण्यास झालेला विलंब माफ होऊन मिळण्याकरिता दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जास प्रतिवादींनी आक्षेप घेऊन अर्ज नामंजूर करणेबाबत म्हणणे दिले आहे.

२. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादींतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

३. अभिलेखावरुन असे दिसून येते की, वादी क्र.६ सत्यभामा बाबासाहेब शिंदे या दि.१९/०२/२०२३ रोजी मयत झाल्या आहेत. त्याबाबत नि.क्र.२७ कडे त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र दाखल करण्यात आले आहे. प्रस्तुतचा अर्ज हा दि.२१/०६/२०२३ रोजी दाखल करण्यात आला आहे.

४. प्रस्तुत दावा हा निरंतर मनाई हुकूम मिळणेकरिता दाखल करण्यात आला आहे. वादींचे असे कथन आहे की, मयत वादी क्र.६ सत्यभामा बाबासाहेब शिंदे यांचा वारस दाव्यात पूर्वीच वादी क्र.७ म्हणून समाविष्ट आहे, त्यामुळे पुन्हा त्यांचे वारस अभिलेखावर घेण्याची आवश्यकता नाही. वादीचे सदर कथनास प्रतिवादींनी आक्षेप घेतलेला नाही. त्यामुळे वादी क्र.६ सत्यभामा बाबासाहेब शिंदे यांच्या मृत्यूनंतर दाव्यामध्ये त्यांचे नावासमोर ''मयत'' असा उल्लेख करुन योग्य ती दुरुस्ती करणेसाठी झालेला विलंब माफ करुन सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. करिता, खालील आदेश पारित करण्यात येतो :

## आ दे श

१) अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) मयत वादी क्र.६ सत्यभामा बाबासाहेब शिंदे यांचे नावासमोर दाव्यामध्ये''मयत'' असा उल्लेख करुन योग्य ती दुरुस्ती करणेसाठी झालेला

विलंब माफ करण्यात येतो.

HANIF MOINUDDIN MOMIN
Digitally signed by HANIF MOINUDDIN MOMIN
Date: 2023.07.13 13:26:49 +0530

दिनांक : ११/०७/२०२३

**( एच.एम. मोमीन )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
वाशी